# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर
## (सचिवालय)

**प्रस्तावना :-** राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाअंतर्गत (DAY-NULM) कृती **{घनकचरा व्यवस्थापन विभाग}** संगम अंतर्गत स्वच्छ् उत्सव् २०२३ च्या निमीत्ताने महिलाकडुन महिलांच्या नेतृत्वाखालील गटामार्फत स्वच्छता या माध्यमातुन विविध कार्यक्रम राबविले जात आहे. यामध्ये स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन समस्यांवर प्रशिक्षित महिला बचतगट सदस्यांचे नेटवर्क अभियानाच्या माध्यमातुन तयार करण्याच्या अनुषंगाने दिनदयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचतगटातील महिला यांच्या माध्यमातुन नागपूर शहरातील नागरीकांच्या घरातील कचरा विलगीकरण करुन देण्याच्या उद्देशाने बचतगटामार्फत कमीतकमी नागरीकांच्या घरापर्यंत पोहचुन स्वच्छतेबद्दल जनजागृती करणे तसेच घंटागाडीत कचरा देतांना ओला कचरा व सुखा कचरा विलगीकरण करुनच देण्याकरीता मार्गदर्शन तसेच समुपदेशनच्या माध्यमातुन MISSION MODE मध्ये कार्य करण्यासाठी नियोजन करण्याचे प्रस्तावीत होते.

समाजविकास विभागामार्फत प्राप्त् माहितीनुसार नागपूर शहरात २४२२ महिला बचतगट असुन प्रत्येक बचतगटाला २०० ते ३०० घर देणे व त्यांच्यामार्फत या घरामध्ये जनजागृती करुन प्रत्येक घरामधुन निघणारा कचरा वर्गीकृत स्वरुपात म्हणजेच ओला, सुखा व घातक या स्वरुपात देण्यास प्रवृत्त् करणे व त्याच स्वरुपात येईल याची जबाबदारी बचतगटावर देणे याकामाकरीता प्रति बचतगट रु. २०००/- प्रतिमाह देण्यात येईल. सदर मोहिम योग्य् पध्दतीने राबविल्यास नागपुर शहरातील कचरा योग्यरीत्या विलगीकरण करुन प्राप्त् झाल्यास सदर कचऱ्यावर योग्यरीत्या प्रक्रिया करणे सोयीचे होईल व त्या माध्यमातुन स्वच्छ् नागपूर, सुंदर नागपूर, स्वस्थ् नागपूर ही संकल्पना साकारता येईल.

समाज विकास विभागामार्फत झोन निहाय उपलब्ध बचत गटांना त्यांचे सोईचा एरिया/परिसर निवडुण इच्छुक बचत गटांना झोन स्तरावरुन सहा. आयुक्त यांचेमार्फत समाजविकास विभागाचे समुह संघटक यांचे शिफारसीनुसार नियुक्त करण्यात येईल प्रति बचत गट रु. २,०००/- प्रतिमाह देण्याचे प्रस्तावीत असल्यामुळे एकुण २४२२ बचत गटांकरीता रु. ४८.४४/- लक्ष रु. खर्च अपेक्षित आहे. तसेच याकामावर देखरेख ठेवण्याकरीता समुह संगठन यांना रु.. १,०००/- प्रतिमाह नुसार ८० समुह संगठनांना रु. ८०,०००/- प्रतिमाह असा एकुण रु. ४९.२४ लक्ष इतका खर्च अपेक्षीत आहे. मा. आयुक्त महोदय यांचे मंजुरीनुसार सदरचे काम प्रायोगीक तत्वावर तिन महिन्याकरीता करावयाचे आहे. तसेच यापुढे जर सदरचे काम याकालावधीमध्ये उपयुक्त् ठरत असेल तर यापुढे सदरचा खर्च कचरा संकलन व वाहतुक करणाऱ्या यंत्रणेच्या मदतीने करुन त्यांचा सेवा पातळी करार गाठण्याकरीता करीता मदत होईल.

प्रायोगीक तत्वावर तिन महिने कालावधीकरीता एकुण खर्च रु. १४७.७२/- लक्ष इतका अपेक्षीत आहे. सदरचा खर्च स्वच्छ भारत अभियान अंतर्गत IEC करीता असलेल्या निधीमधुन निधी उपलब्धतेनुसार किंवा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे पद क्र. A२४१०१२३१७०१ अंतर्गत भागविण्यात येईल.

विषयाचे प्रारुप मा. प्रशासक यांचे मान्यतेस सादर.

**टिप** :- सविस्तर माहिती नस्तीमध्ये उपलब्ध आहे.

## पारीत ठराव

**ठराव क्रमांक :-** 362 **/मनपा/प्रशासक** **दिनांक :-** 12 / 05/2023

महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील शासन आदेश क्रमांक एमसीओ-२०२०/प्र.क्र. ७१ (भाग-२) /नवि-१४ दिनांक ०३/०३/२०२२ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ च्या (१ अ) व (१ब) मधील तरतूदीनुसार दिनांक ०४-०३-२०२२ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार उपायुक्त तथा संचालक, घनकचरा व्यवस्थापन विभाग यांनी वरील प्रमाणे प्रस्तावीत केल्यानुसार राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियानाअंतर्गत (DAY-NULM) कृती संगम अंतर्गत स्वच्छ् उत्सव्

२०२३ च्या निमीत्ताने महिलाकडुन महिलांच्या नेतृत्वाखालील गटामार्फत स्वच्छता या माध्यमातुन विविध कार्यक्रम राबविले जात आहे. यामध्ये स्वच्छता आणि कचरा व्यवस्थापन समस्यांवर प्रशिक्षित महिला बचतगट सदस्यांचे नेटवर्क अभियानाच्या माध्यमातुन तयार करण्याच्या अनुषंगाने दिनदयाल अंत्योदय योजना – राष्ट्रीय नागरी उपजिवीका अभियान अंतर्गत नोंदणीकृत स्वयंसहाय्यता बचतगटातील महिला यांच्या माध्यमातुन नागपूर शहरातील नागरीकांच्या घरातील कचरा विलगीकरण करुन देण्याच्या उद्देशाने बचतगटामार्फत कमीतकमी नागरीकांच्या घरापर्यंत पोहचुन स्वच्छतेबद्दल जनजागृती करणे तसेच घंटागाडीत कचरा देतांना ओला कचरा व सुखा कचरा विलगीकरण करुनच देण्याकरीता मार्गदर्शन तसेच समुपदेशनच्या माध्यमातुन MISSION MODE मध्ये कार्य करण्यासाठी नियोजन करण्याचे प्रस्तावीत होते.

समाजविकास विभागामार्फत प्राप्त् माहितीनुसार नागपूर शहरात २४२२ महिला बचतगट असुन प्रत्येक बचतगटाला २०० ते ३०० घर देणे व त्यांच्यामार्फत या घरामध्ये जनजागृती करुन प्रत्येक घरामधुन निघणारा कचरा वर्गीकृत स्वरुपात म्हणजेच ओला, सुखा व घातक या स्वरुपात देण्यास प्रवृत्त् करणे व त्याच स्वरुपात येईल याची जबाबदारी बचतगटावर देणे याकामाकरीता प्रति बचतगट रु. २०००/- प्रतिमाह देण्यात येईल. सदर मोहिम योग्य् पध्दतीने राबविल्यास नागपुर शहरातील कचरा योग्यरीत्या विलगीकरण करुन प्राप्त् झाल्यास सदर कचऱ्यावर योग्यरीत्या प्रक्रिया करणे सोयीचे होईल व त्या माध्यमातुन स्वच्छ् नागपूर, सुंदर नागपूर, स्वस्थ् नागपूर ही संकल्पना साकारता येईल.

समाज विकास विभागामार्फत झोन निहाय उपलब्ध बचत गटांना त्यांचे सोईचा एरिया/परिसर निवडुण इच्छुक बचत गटांना झोन स्तरावरुन सहा. आयुक्त यांचेमार्फत समाजविकास विभागाचे समुह संघटक यांचे शिफारसीनुसार नियुक्त करण्यात येईल प्रति बचत गट रु. २,०००/- प्रतिमाह देण्याचे प्रस्तावीत असल्यामुळे एकुण २४२२ बचत गटांकरीता रु. ४८.४४/- लक्ष रु. खर्च अपेक्षित आहे. तसेच याकामावर देखरेख ठेवण्याकरीता समुह संगठन यांना रु.. १,०००/- प्रतिमाह नुसार ८० समुह संगठनांना रु. ८०,०००/- प्रतिमाह असा एकुण रु. ४९.२४ लक्ष इतका खर्च अपेक्षीत आहे. मा. आयुक्त महोदय यांचे मंजुरीनुसार सदरचे काम प्रायोगीक तत्वावर तिन महिन्याकरीता करावयाचे आहे. तसेच यापुढे जर सदरचे काम याकालावधीमध्ये उपयुक्त् ठरत असेल तर यापुढे सदरचा खर्च कचरा संकलन व वाहतुक करणाऱ्या यंत्रणेच्या मदतीने करुन त्यांचा सेवा पातळी करार गाठण्याकरीता करीता मदत होईल.

प्रायोगीक तत्वावर तिन महिने कालावधीकरीता एकुण खर्च रु. १४७.७२/- लक्ष इतका अपेक्षीत आहे. सदरचा खर्च स्वच्छ भारत अभियान अंतर्गत IEC करीता असलेल्या निधीमधुन निधी उपलब्धतेनुसार किंवा घनकचरा व्यवस्थापन विभागाचे पद क्र. A२४१०१२३१७०१ अंतर्गत भागविण्यात येईल.

उपरोक्त प्रस्तावास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.

**हस्ता/-**

**राधाकृष्णन बी. (भा.प्र.से.)**

**प्रशासक**

**नागपूर महानगरपालिका, नागपूर**